# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २५/०८/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २५/०८/२००६ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. २१/०८/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ७) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ९) | श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| १०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १३) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| २) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ३) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग, यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगर सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ८५ चे वाचन केले)

**शशिकांत भोईर :-**

मा. अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने मी एक सुचना मांडू इच्छितो की, आपण स्टँडींगला काही कामे मंजूर करतो. त्याची काही सदस्य कामे आम्ही डायरेक्ट मंजूर केलेली आहेत, ते असे लिहितात, ते योग्य आहे का? प्रशासनाने पहिला याचा खुलासा करा. स्टँडींग कमिटीमध्ये सदस्य १६ आहेत. १६ सदस्य मंजूरी देतात. एकाच्या मंजूरीने कामे मंजूर होणार नाही. तर ते योग्य आहे का? अशी बोर्ड होर्डीगमध्ये लावले ते योग्य आहेत का?

**हंसूकुमार पांडे :-**

स्टँडींग कमिटीने काम पास किया ऐसा बोलना चहिए ना? अपने अपने पार्टी वाले अपना बोर्ड लगाते है। १६ सदस्य सभी पार्टी के इसमें मेंबर है। तो उनके माध्यमसे काम पास होता है। एक आदमी ने थोडी काम पास कराके लिया?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बोर्ड कुठे लावला?

**जयंत पाटील :-**

स्थायी समिती ही सर्व शहरासाठी आहे. इथे असलेले सर्व मेंबर हे पक्षभेद विसरुन शहराचं भलं कसं होईल? शहरात चांगल्या सुविधा कशा मिळतील? त्या दृष्टीने आपण प्रयत्न करतो. मग, इकडे आपण एखादा ठराव सर्वानुमते मंजुर केला. तर, वैयक्तिक जयंत पाटील साहेबांनी केला किंवा वैयक्तिक यांनी केला असे होत नाही. सर्वांनी मिळून ठराव पास केला.

**जेन्वी अल्मेडा :-**

स्टँडिंगचे सदस्य उपस्थित असतात त्यांच्या संमतीने ठराव पास करतात.

**शशिकांत भोईर :-**

सर्व पक्ष असु दे. मला काही वाटणार नाही. माझे हेच झाले की, उद्या मीच एकटा बोलेल की, स्थायी समितीने मंजुरी दिली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब बोर्ड कसला लागला? आणि कुठे लागला?

**शशिकांत भोईर :-**

स्टेशनला लागलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्टेशनला बोर्ड लागलेत. कुठल्या पद्धतीचे बोर्ड लागलेले आहेत?

**हंसूकुमार पांडे :-**

हमलोग अभी चौपाटीका भी बात करते थे। चौपाटी विकसीत करनेमें खाली बी.जे.पी. का हात नही है। ऐसा नही चौपाटी के वहाँ हर बोर्ड बी.जे.पी. काही लगता रहता है। और हम लोग पानपट्टे साहब को भी बोलते है की, उनका बोर्ड चौपाटी पर एक-एक साल तक लगा रहता है। काँग्रेस का बोर्ड लगेगा तो आठ दिन में काँग्रेस का, राष्ट्रवादी का बोर्ड निकल जाता है। तो ऐसा क्यों?

**एस. ए. खान :-**

असा भेदभाव व्हायला नको ना. ठेवायचे तर सर्वांचे राहू द्या.

**हंसूकुमार पांडे :-**

भेदभाव कशाला? रोड स्टँडिंग कमिटीच्या १६ सदस्यांनी पास केला. तीन बाजूका जगह पास करके लिया। वहाँ बोर्ड लग गया की, स्टँडिंग मे हमने पास किया। ऐसा थोडी होता है। स्टँडिंग में १६ मेंबर है। और वह सब अलग अलग पार्टी के है। राष्ट्रवादी है, काँग्रेस है, बी.जे.पी. है, और शिवसेना है। तो वो सब मिल के पास हो गया। स्टँडिंग के कमिटीके हिसाबसे पास हो गया। अगर तो हमनें पास किया और हमने बोर्ड लगाया की, काँग्रेस ने पास करके दिया ऐसा नही होता ना। एक पार्टी थोडी कुछ भी करता है। स्टँडिंगमें सभी पार्टी के मेंबर हे।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य हंसूकुमार पांडे साहब, ॲकच्युली आपकी बात क्लिअर कट समझमें नही आ रही है। आपने बोला एक ही पर्टीक्युलर चौपाटी। लेकीन अभी चौपाटी का कोई सब्जेक्ट नही।

**हंसूकुमार पांडे :-**

चौपाटीमें लास्ट टाईम ५१ लाख रुपया पास हुआ था रोड के लिए। तीन साईड का रोड बनाने के लिए। मै बी.जे.पी. का खास कर के बोलूंगा के, काका के ऑफिस के सामने बोर्ड लगा हुआ है की, हम लोगोंने पास करके लिया है। सन्मा. सदस्य मदनसिंह और सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ने। ऐसा नही होता ना। यह दो आदमीने पास कराया था। हम लोगोंने सहमती दिया तभी पास हुआ ना? मा. सभापती साहेब, तुम्ही पण काही बोला. तुम्ही काँग्रेसचे सभापती आहात.

**जयंत पाटील :-**

चांगल्या कामाला आम्ही विरोध करु.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य हंसूकुमार पांडे साहेब, आपण असे कधी बोलू नका. मी जर सभापती आहे तर सर्व पक्षासाठी आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

सर्व पक्षासाठी आहात. पण साहेब, तुम्ही काही बोलत नाही.

**मा. सभापती :-**

काही बोलत नाही म्हणजे काय?

**हंसूकुमार पांडे :-**

मग, तुम्ही पण बोला ना. असे का केले?

**मा. सभापती :-**

बोलतो ना. पण, आता तुम्ही बोलत आहात तर मग, मी काय बोलणार?

**हंसूकुमार पांडे :-**

ठिक आहे. मा. सभापती साहेब, तुम्ही बोला.

**जयंत पाटील :-**

या विषयावरती काकांनी आपलं मत सांगावे.

**रोहीदास पाटील :-**

सगळ्यात शेवटी एकमत हे होणारच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काकांनी सुचवल्याप्रमाणे, काकांनी अमाउंट छोटी सुचवली होती. आम्ही सगळ्यांनी मिळून ती अमाउंट मोठी सुचवली. म्हणजे आम्ही कुठेही भेदभाव ठेवला नाही. काकांनी पण थोडसं असे ठेवले पाहिजे होते की, जसे सन्मा. सदस्य मदन सिंग साहेब तुम्ही नाव टाकले. तसे सगळ्या स्थायी समितीच्या सदस्यांची नावे टाकले असते तर गोष्ट वेगळी. सन्मा. सदस्य मदनसिंग यांचा ह्याच्यात संबंध नाही. तरीसुद्धा तुम्ही सन्मा. सदस्य मदन सिंग यांचे नाव टाकले. असे आहे की, ज्या वॉर्डमध्ये हे लोक राहतात त्यांची पण नावे टाकले असती तर की सगळ्या स्थायी समितीचे नावे सांगितली असती.

**शशिकांत भोईर :-**

गणपती उत्सव जवळ येणार म्हणून आपण तातडीने मंजुरी दिली. असे बघितले असते तर मा. महासभेची मंजुरी घेणे गरजेचे होते. त्यानंतर आपण हा विषय आणायला पाहिजे होता. असे पण झाले नाही ना. नागरिकांमध्ये मेसेज वेगळा पडतो. एकच पक्ष काम करतात आणि दुसरा पक्ष करत नाही. स्टँडींगमध्ये सर्व सदस्य आहे.

**मा. सभापती :-**

विषय झाल्यानंतर ह्या विषयाची चर्चा करुया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, पहिले काकांचे मत मांडू द्या. मग तुमचे मत मांडा.

**रोहीदास पाटील :-**

आपण नक्की सगळे एकाच मताचे आहोत. आमच्या पक्षाचे वतीने त्यांनी स्वतः सभापतींना सांगितले आहे. स्थायी समितीचे कामे भारतीय जनता पार्टीची कुठेही अडचण म्हणून येणार नाही. अशा पद्धतीने तुम्ही कामकाज चालवावे चालवावे अशी अपेक्षा. चार विषय कोणते चांगले घ्यायचे आहे तुम्ही घ्या. आणि तीन बैठकी होतील त्या बैठकी मध्ये तुंम्हाला कोणते विषय घ्यायचे ते घ्या. त्याला कुठेही अडचण राहणार नाही. ह्यांच्या चेंबरमध्ये जाउन पक्ष म्हणून सांगितलेले. त्यामुळे सन्मा. सदस्य हंसूकुमार साहेबांनी जसे सांगितले ते सांगू शकतात. त्यांनी चुकीचे काहीच सांगितले नाही किंवा सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी मांडले असेल तर ते ही चुकीचे सांगितले नाही. कार्यकर्त्यांचा उत्साह सन्मा. सदस्य मदन सिंहने केले असे पण ते लिहिले नाही. तो बोर्ड माझ्याच नावाने लिहिलेला आहे की, स्थायी समिती सदस्य रोहिदास पाटील यांनी केले. पण त्या बोर्डाच्या तुमच्या जशा भावना असतील त्याच भावना माझ्या असायला पाहिजे आणि त्याच आहेत. उत्साही कार्यकर्ते असतात. कार्यकर्त्यांच्या उत्साहांचा कार्यक्रम जो लागून जातो. तो तुम्हालाही माहित पडत नाही आणि मलाही माहित पडत नाही. पण जसे असे म्हणावे की, त्याचे मॅटर काकांनी बनवून दिलेले आहे. असे असते तर मी दिलगीरी पण व्यक्त केली नसती. कारण मी जर केले तर ते मला सांगायला पाहिजे मी केले म्हणून

**हंसूकुमार पांडे :-**

काका आपके बोर्डपे लिखा है।

**रोहीदास पाटील :-**

मैने ठिक से पढा।

**हंसूकुमार पांडे :-**

आप जो दिल की बात बोल रहे हो वा आपको मालूम है। लेकिन पब्लिक को क्या मालूम है की, रोहीदास पाटीलने किया।

**रोहीदास पाटील :-**

पब्लिक भी समझती है।

**हंसूकुमार पांडे :-**

पब्लिक को नही समझता है। जो लिखता है वही पब्लिक समझती है। तो फिर लिखने का नही अगर, पब्लिक समझती है तो आपको बोर्ड पे लिखना नही चाहिए।

**रोहीदास पाटील :-**

आप ऐसा चर्चा करेंगे तो प्रोसिडींगमें कुछ नही आएगा। आनेका तो आने दो और सही ढंग से आने दो। मैने एक बात क्लिअर किया। दुसरा की चौपाटी भाजप का है। तो हम सभागृहमें आपको बोलेंगे की, चौपाटी भाजप का, या रोहिदास पाटील, या मदन सिंह इनका स्पष्ट रोल है।

**हंसूकुमार पांडे :-**

ऐसा नही होता।

**रोहीदास पाटील :-**

उसपे बोर्ड लगाने के लिए हमने किसीको भी नही रोका नही। आपने निवेदन किया की, हमारे कॉंग्रेसका बोर्ड तुरंत निकलता है। तो हमने कभी कंम्प्लेंट नही किया। मैने कभी भी कंम्प्लेंट नही किया। मेरे जानकारी के हिसाबसे सन्मा. सदस्य मदन सिंह ने भी ऐसा कभी नही बोला की वो बोर्ड सन्मा. सदस्य हंसूकुमार पांडे या किसी सदस्य का है। तो वो निकालो। ऐसा उन्होंने चार साल के अंदर कभी भी बोला नही।

**हंसूकुमार पांडे :-**

मैं मा. सभापती साहबको विनंती करता हूँ की पानपट्टे साहब को यहाँ बुलाईए।

**जयंत पाटील :-**

चौपाटी वर काका तुमचा रोल आहे किंवा तुमच्या पक्षाचा रोल आहे. हा विषय तुम्ही सोडून द्या. सर्वपक्षी आर्थिक मंजुरी देते.....

**रोहीदास पाटील :-**

नुसत बोलले म्हणून रेकॉर्डला नाही. १० मिनीटांचे सर्व निवेदन त्या प्रोसिडींगमध्ये येउ दे.

**जयंत पाटील :-**

आपण महापालिकेचा पैसा खर्च करतो.

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही इथले स्थानिक नगरसेवक आहात. आमचा बोर्ड रहाणार नाही का? तुम्ही असे का सांगता आम्ही काही वेगळ करतो का? स्थानिक नगरसेवक आहात. तुम्ही स्वच्छता ठेवा. तुमच स्वागत करतो. हे बोर्ड कोणीही कुठे लावले तर कसे चुकीचे होईल. आता सन्मा. सदस्य मदन सिंह चा बोर्ड आहे. तर मी स्पष्ट बोलतो ते चुक आहे. पण आम्ही स्थानिक नगरसेवक स्वागत करतो. चुक कसे होईल?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये आपण आजच्या निवीदा सुरू करू. म्हणजे कसे बोर्ड लागले पाहिजे? बोर्ड काय लागले पाहिजे?

**रोहीदास पाटील :-**

कॉंग्रेस (आय) चा बोर्ड लागला की तुम्ही लगेच काढता. आम्ही तुमच्याकडे कधी चार वर्षात तक्रार केली.

**हंसूकुमार पांडे :-**

तुम्हाला मी विचारती ना. किती वेळा तुंम्हाला कंप्लेंट दिली. आमचा बोर्ड सहा दिवस पण रहात नाही. राष्ट्रवादीचा असु द्या किंवा कॉंग्रेसचा बोर्ड असु द्या. बि.जे.पी. चा बोर्ड एक एक वर्ष रहातो. आम्हांला दाखवा बि.जे.पी. ने किती पैसे भरले. महिलांसाठी, मुलांसाठी नविन बनवून देणार आहेत. तसा त्या साईडला बोर्ड लावलेला आहे. मदनसिंग, रोहीदास पाटील यांचा. तर हे बरोबर आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

काढला असेल.

**हंसूकुमार पांडे :-**

कुठे काढला? साहेब, जाउन बघा. एक वर्ष झाले. चार वर्ष झाले तुंम्हाला बोलून बोलून थकलो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

दोन-तीन वेळा बोर्ड काढला.

**हंसूकुमार पांडे :-**

साहेब, तुम्ही बोलूच नका. तुम्ही खूप खोट बोलता. पानपट्टे साहेब, तुम्ही जेवढे खोट बोलता तेवढ खोट कोणीच बोलत नाही. तुंम्हाला १० वेळा सांगितले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त मुख्यालय साहेब, सन्मा. सदस्य पांडे साहेब, बोलतात ते बरोबर आहे. आपल्या स्टॅंडीग कमिटीच्या मिटींगला प्रत्येक वेळी हा विषय निघतो. की आपली जी सार्वजनिक प्रॉपर्टी आहे. स्मशानभूमी आहे. गाडर्न आहेत. चौपाटी आहे इतर ठिकाण आहे तिथे पर्टीक्युलरली त्या माणसाचं नावं येते. की, सन्मा. सदस्य सो ॲन्ड सो नगरसेवक यांच्या प्रयत्नाने. पण हा प्रयत्न सगळ्यांचा असतो. पालिकेचा पैसा असतो. मग, त्या पर्टीक्युलर त्या नगरसेवकचा प्रयत्न कसा काय येतो?

**जयंत पाटील :-**

त्यांनी जर एखादे काम केले असेल तिकडेच फक्त त्यांना बोर्ड लावता येईल. नगरसेवक निधीतून. अदरवाईज हा सर्व पैसा महापालिकेचा आहे आणि सगळ्यांच्या मंजुरीने.

**मा. सभापती :-**

त्या दिवशी भाईंदर ईस्टला गेलो होतो. तिथे सुद्धा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचे नावं लागलेले आहेत. साहेब, तुम्ही अस काही ठेवू नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यावर रुलिंग देतात.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने मी एक निवेदन करतो. महापालिका किंवा प्रशासन, शासकिय ठराव किंवा जिल्हा परिषदेस कोणत्याही संस्थेमार्फत किंवा शासनामार्फत आपण कार्यक्रम घेतो. त्यामध्ये सॅन्शन करणारी ॲथोरिटी ही सामुहिक असते आणि पैसा हा नागरिकांचा असतो. त्यासाठी प्रोसेशन करणारे किंवा पाठपुरावा करणारा कोणीतरी शक्ती असते. पण, ते गुपित असते. आणि फिल्ड स्तरावर काम करणारे व्यक्ती त्या सर्वांना मॅप असतात. तरी जे डिसीजन असतात ते सामुहिक डिसीजन असतात. त्याचे संस्थेची किंवा शासनाचे डिसीजन असतात. वैयक्तीक व्यक्तीचे नसतात. आपण लोकशाही प्रणालीमध्ये वेगवेगळ्या पक्षपार्टीवर लोकांसमोर जावून, आपण निवडणुकीच्या माध्यमातुन तुम्ही निवडून आलात. आपल्या प्रत्येकाला नागरिकांनी निवडून दिले. त्याचे जे वोटींग आहे. त्याप्रमाणे आपण त्या पक्षाचे सदस्य आहात. त्यावेळेस आपण एखाद्या प्रशासकीय स्तरावर डिसीजन मेकींग करतो. त्यावेळेला आपण सर्व एक आहोत. एक संस्था म्हणून आपण प्रशासकीय मंजूरी देतो आणि संस्थेच्या नावाने आपण काम मंजुर करुन घेतो. पण, महापालिकेकडून अमुक पार्टीने काम केले असे कुठे डिसप्ले करत नाही. हे फॅक्ट आहे. काही स्फुर्त कार्यकर्ते म्हणा किंवा सन्मा. सदस्यांच्या भागातले चाहते म्हणा. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी म्हटल्याप्रमाणे ते डिसप्ले होतात. पण संहिता अशी आहे की, तसे डिसप्ले कोणालाही करता येत नाही व खासदार, आमदार साहेबांचे बोर्डसुद्धा आपण इलेक्शनच्या काळात आचारसंहितेच्या नावाखाली आपण काढतो. तर संहिताही प्रत्येकाने मानने आवश्यक आहे आणि महापालिकेकडून किंवा शासनाकडून एखादा प्रोग्राम होउन त्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन, त्यांची उपस्थिती हा जो बोर्ड असतो तो शासकीय बोर्ड असतो. भुमीपुजनाचा बोर्ड किंवा उद्‌घाटनाचा बोर्ड हे आपण महापालिकेकडून करतो. या शिवाय या ठिकाणी नमुद केलेले गार्डन स्मशानभुमी बाबतचे बोर्ड होते ते महापालिकेकडून केलेले आहे. पण जुने जे बोर्ड आहेत ते काढायचे राहिलेले आहेत. असे कार्यकारी अभियंताकडून अहवाल आम्ही घेतलेला आहे. येणाऱ्या काळामध्ये आम्ही त्याच्यावर कारवाई करु. आणि वैयक्तीक संहीता पाळण आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय निघाला म्हणून मी बोलतो. बोर्ड लावण्यासंबंधी होर्डिंग्ज हा विषय बाजुला राहिला. होडिंग्ज लावण्यासंबंधी आपण काही नियम ठरवतो. पण त्याप्रमाणे कधी इम्प्लीमेन्टेशन होत नाही. मागे या महासभेत हा विषय आला होता. आणि होडिंग्ज कुठल्या ठिकाणी लावायचे. मग ते स्वागताचे बोर्ड असो, शुभेच्छांचे बोर्ड असु दे किंवा वाढदिवसाचे बोर्ड असु दे. त्याचे आपण ठिकाण ठरवलेली होती. कुठेही कोणीही बोर्ड लावतो. शिवाजीचा पुतळा. शिवाजी महाराज कुणाच्या स्वप्नात येउन बोलत असतील की, मला कोणी इथुन काढून टाका. इकडे महान नेत्यांचे फोटो लागलेत. ते माझ्यापेक्षा महान आहेत असे त्यांच्या मनात कदाचित येत असेल. तुम्हाला महत्वाचे काय आहे? पुतळा महत्वाचा आहे की, होर्डिंग्ज महत्वाचे आहेत? ५० कार्यकर्ते आहेत सर्वांचे छोटे छोटे फोटो असतात.

**हंसुकुमार पांडे :-**

शिवाजी का पुतला मिरा भाईंदर की एक शान है। वो तो एक प्रवेशव्दार है। और शान है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

या पूर्वीच्या स्थायी समितीच्या सदस्यांमध्ये चर्चा झालेली होती.

**हंसुकुमार पांडे :-**

लेकिन, उसपर साफसफाई का भी कारवाई होना चाहिए। आप उदर जाके देखिए उसके उपर कितनी गंदगी है।

**जयंत पाटील :-**

एक-दोन झेंडे लागलेले काढले का ?

**हंसुकुमार पांडे :-**

महिने- दो महिनेमे वहाँ साफसफाई होना चाहिए। सालो साल वहॉ साफ सफाई नही होती।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

साफसफाई करुन घेवू. त्या ठिकाणी होर्डिंग्ज लावून आपण डिसप्ले सुद्धा केलेला आहे. एक छोटा बोर्ड लावलेला आहे. या ठिकाणी कोणी होर्डिंग्ज लावू नये.

**जयंत पाटील :-**

त्याला लागूनच होर्डिंग्ज लावतात.

**रोहिदास पाटील :-**

खतगांवकर साहेब, तुम्हाला एकतर नक्की ठरवायला लागेल आणि तुम्ही ठरवलेले आहे. पण, त्याची पुर्तता करत नाही. जसे आपण मोठा गेट बनवायला दिला. एस्सलवर्डला दिला त्याचा पिच्चर तिथे कोणताही नीट नाही. उघडे-नागडे ते पिच्चर दिसतात. म्हणजे एकदा प्रवेश दारात घुसतील तर ॲट्रेक्शन वाढेल. तर ॲट्रेक्शन वाढायच्या ऐवजी उलट ते गचाळ दिसते छत्रपती शिवाजी महाराजांसाठी एक कार्यक्रम पाहिजे. तिथे कोणी एक्जीक्युटर ने विचारले. तर साफ कोण करणार? १५ दिवसाने २० दिवसाने साफ करावे. त्याच्यावर कबुतर बसतात, धुळ उडते, तर हा माणुस साफ करेल. तो माणुस शिडी वरपासून ते खालपर्यंत साफ करेन. पहिल्यांदा कोणी जर फुलांचा हार घातला असेल तो काढेल. आणि एकदा जर ठरले की, बोर्ड लावायचा नाही. मग, कोणाचा सुद्धा बोर्ड असु दे तो लावलाच नाही पाहिजे. जर लागेल तर, त्याच्यावर कारवाई करा. हा महत्त्वाचा मुद्दा नाही. तो बोर्ड जर लागला तर लगेच तो बोर्ड निघायला पाहिजे. कारवाई उत्तर नाही. तिथे आता पुतळे सांभाळा म्हणून दुसऱ्या पुतळ्याला परवानगी देत नाही. आणि लावलेल्या पुतळ्याची तुम्ही सरंक्षण करत नाही. लावलेल्या पुतळ्याची सरंक्षण करायची आपल्या महापालिकेची काय कारवाई आहे. कोणाची जबाबदारी आहे? ते तुम्ही दिले का?

**एस्. एस्. पानपट्टे :-**

सिक्युरीटी गार्ड तिथे असतात.

**रोहिदास पाटील :-**

कोणीतरी उत्साहाने लावतो आणि ते कोणाला माहित नसते. सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे साहब आपका बोर्ड कोण लगाता है, वो किसीको मालूम नही पडता। फिर आपको मे बोलूंगा तो वो अच्छा नही। इसलिए उधर आदमी खडा रहेगा तो वो बोर्ड बांधने नही देगा। अगर, गलतीसे बांधा तो निकालेंगे।

**हंसुकुमार पांडे :-**

दो-चार बार ऐसे होगा तो लगायेंगे भी नही।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब, आपण तिथे सिक्युरिटी गार्ड नेमुया आणि आता मी तुम्हाला बोललो की, सार्वजनिक जी आपली मालमत्ता आहे. स्मशानभुमी, चौपाटी, या ठिकाणी काही सन्मा. सदस्यांचे बोर्ड लागलेत. यांच्या प्रयत्नाने पण, ठिक आहे म्हणजे ते जे वॉर्डचे नगरसेवक असतील. इट्स ओके नो प्रॉब्लम. पण, जर असे लिहले असेल की, ह्यांच्या प्रयत्नाने तर साहेब ते काढून टाका.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, मी तुम्हाला माहिती पण सांगतो. तो जो बोर्ड आहे कोणालाही असु दे. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब जे बोलले ते चुकीचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमचं बोलत नाही. मी भाईंदर पश्चिमेबद्दल बोलत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी पूर्वेच पण सांगतो ना. मी तिकडचा नगरसेवक आहे. 'गणेश भक्तांचे हार्दिक स्वागत' स्थानिक नगरसेवक एवढं लिहणार नाही तर आणखीन काय लिहणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी ते बालत नाही. मी असे म्हटलेले आहे की, आपली भाईंदरची जी स्मशानभुमी आहे, चौपाटी आहे. ह्याच्यामध्ये काय लिहलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

काका मी स्वागतबद्दल बोललो नाही. मी ४९ लाख रु. अमुक.....

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मदनसिंगच्या नावाने. मदनसिंगने लिहले.

**शशिकांत भोईर :-**

कोणी पण लिहले. पण नावे सर्वांची आहेत.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापती साहेब, मी चौपाटीवर प्याऊ बनवायचा प्रस्ताव टाकलेला आहे. मी स्थायी समितीला शिफारस करतो की, मला त्याची मंजुरी द्यावी.

**रोहिदास पाटील :-**

ह्याचे तीन प्रस्ताव आहेत. पण ह्याची जागा हॅंडओव्हर होत नाही. म्हणून नगरपालिका देत नाही. आपण त्यांना शिफारस दिली आणि तुम्ही आम्हाला मंजुरी दिली.

**हंसुकुमार पांडे :-**

त्या जागेत इलेक्ट्रीकचे केबीन आहे ना. त्याच्याबाजुला आम्ही करुन घेणार आहे. आम्ही लेटर दिलेले आहे. आम्हाला फक्त तुम्ही मंजुरी द्या. चौपाटीवर एवढे लोक येतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहब, कभी-कभी ऐसा होता है की, दिक्कत होती है। लेकिन अन-ऑफिशिअली भी परमिशन लेके कर सकते है ना। साहेब अप द रेकॉर्ड त्यांना अलॉव्ह करा ना.

**रोहिदास पाटील :-**

स्थायी समितीमध्ये कधी असे विषय होतात का? मंजुरी दिली म्हणून.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मंजुरी द्यायचा अधिकार नाही ना.

**रोहिदास पाटील :-**

मग हा विषय स्थायी समितीचा नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्थायी समितीचा विषय का नाही.

**रोहिदास पाटील :-**

स्थायी समिती आपण स्थायी समितीसाठी चालवतो. जिथे चुकले तिथे आपण माफी मागायची.

**शशिकांत भोईर :-**

लोकांना पाणपोई, शौचालय, मुलांना खेळायला गार्डन ............

**हंसुकुमार पांडे :-**

काका अगर हॅन्डओव्हर नही हुआ तो आप हमको थोडा सपोर्ट करोगे ना। तो आराम से हो जाएगा। आपका खाली निर्णय चाहिए की आप हमको सपोर्ट कर रहे है की बना दो। आपके निधी से और हमारे निधी से बना रहे है। उसके लिए आपका सपोर्ट चाहिए।

**जयंत पाटील :-**

तुम्ही म्हणता हॅन्ड वर्क झालेले नाही. मग एवढा करोडो रुपये आपण खर्च का करतो?

**रोहिदास पाटील :-**

आपण आपल्या गरजेसाठी आपण हेड बदलून करतो. हे लक्षात घ्या.

**जयंत पाटील :-**

हेड बदलून नाही करत. मंजुरी देउन आपण करतो.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, तुम्ही एवढ लक्षात घेत नाही. ते जर बनवताना अडचण जर नसती तर थाडी तरी विनंती केली नसती.

**जयंत पाटील :-**

तिकडे प्याऊ एवढ्या महत्वाची आहे. लोकांना पाण्याची सोय करण्यासाठी. त्याला विरोध करण्याचे काहीही कारण नाही.

**रोहिदास पाटील :-**

तिथे प्याऊ बनवलेले आहे. त्याच्यात आपली महानगरपालिका पाणी टाकत नाही.

**जयंत पाटील :-**

प्याऊ बनविणारे बघतील ना. त्यांचा लुकआउट आहे.

**रोहिदास पाटील :-**

लोकांना पाणी पिण्यासाठी आम्ही तिथे टाकी बांधलेली आहे. पहिल्यांदा तिथे टँकर पॉईंट होता. तेव्हा तिथे पाणी टँकरमध्ये टाकत होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही तुम्हाला योग्यप्रकारे सहकार्य करु.

**जयंत पाटील :-**

परंतु, त्या ठिकाणी बऱ्याच प्रमाणात गुंडगिरी चालते. त्यामुळे त्या ठिकाणी पोलिस चौकी होणे आवश्यक आहे. मागच्या वेळेला सन्मा. सदस्या शानु गोहिल यांनी पोलिस चौकी बांधणेबाबत अर्ज केलेला होता. परंतु, माझ्या मते याच्यासाठी कोणाचा विरोध असण्याचे काहीही कारण नाही. आम्ही सर्वजण सहकार्य करु.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पोलिस चौकीचा विषय एस.पी. कडे न्यावा लागेल.

**जयंत पाटील :-**

एस.पी. ने पोलिस चौकी बांधण्यासाठी मंजुरी दिलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासनाच्या ताब्यात चौपाटीच्या जागा नसल्याने चौपाटीचा विषय प्रशासनाच्या अखत्यरित येत नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्याला चौपाटीच्या विषयासाठी नगरसेवक निधी वाचरावा लागेल.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्या शानु गोहिल यांच्या म्हणण्याप्रमाणे पोलिस चौकीच्या विषयाला कोणाचा विरोध असणार नाही. परंतु, त्याबाबत वेगळीकडे पत्रव्यवहार करावा लागेल.

**जयंत पाटील :-**

माझ्यामते या विषयाला तुमचा विरोध असु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

चौपाटी आमच्या ताब्यात आहे.

**शशिकांत पाटील :-**

आपण आता पोलिस चौकीच्या विषय सुचविला. सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे यांनी पाणपोईबाबत सुचविले. अशा काही संस्था आहेत ज्या उपाययोजना करुन देतात. आपले शौचालय होणेसुद्धा आवश्यक आहे. आपल्याकडे काही लोक मॉर्निंग वॉकसाठी फिरायला जातात. मुलेसुद्धा फिरायला जातात. त्यांच्यासाठी काही व्यवस्था करायला पाहिजे. कारण हे लोकोपयोगी काय आहे. आपण लोकांचे पैसे खर्च करतो.

**रोहिदास पाटील :-**

आपण दरवर्षी महापालिकेतर्फे क्र. १ कोटी खर्च करतो. परंतु, नगरपरिषदेने कधीही भुमिका घेतलेली नाही. आपण नगरपालिकेच्या वेळेला रु. ५० हजार खर्च करीत होतो. आता महापालिका झाली त्यामुळे आपण आता रु. १ कोटी खर्च करतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपल्याला त्यासाठी प्लॅन करावा लागेल.

**दिपक खांबीत :-**

आपल्या ताब्यात जागा नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपण बघितले तर आपल्याला असे आढळून येईल की अन्य ठिकाणीसुद्धा समुद्र आहे. परंतु, आपली चौपाटी त्यापेक्षा वेगळी आहे. आपण आपल्या चौपाटीसाठी प्लॅन पास केलेला आहे. जर आपल्याला टेन्डर पास करण्यामध्ये अडचण आली असती तर आपल्याला रु. १ कोटीचे टेन्डर पास करायला मोका मिळाला नसता.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही संगणक चालक ठेका पद्धतीने नेमलेले होते. त्यांची मुदत दि. ३१/७/२००६ रोजी संपलेली आहे आणि या गोष्टीला एक महिना झालेला आहे. तुम्ही हा विषय मुदत संपण्यापूर्वी आणायला पाहिजे होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आम्ही विषय दिलेला होता आणि तो विषय मा. आयुक्त साहेबांच्या मंजूरीने प्रशासनाकडून दिलेला होता. महापालिकेने महापालिकेच्यावतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मानधनावर ठेवावे असा ठराव मंजूर केलेला होता. तो शासनाकडे पाठवलेला होता.

**जयंत पाटील :-**

आपण तो ठराव मंजूरीसाठी पाठवलेला नव्हता. आपण तो ठराव मार्गदर्शनासाठी पाठवलेला होता. आपल्याला त्या ठरावाबाबत शासनाकडून डायरेक्शन पाहिजे.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही हा ठराव मंजूरीसाठी पाठवलेला आहे का?

**जयंत पाटील :-**

परंतु, ह्या गोषवाऱ्यामध्ये मार्गदर्शन हा शब्द आहे. हा विषय महासभेत मंजूरीसाठी गेलेला होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

परंतु, ह्या विषयाला मान्यता मिळाली या हेतूने हा विषय पेन्डिंग होता. परंतु, मान्यता मिळालेली नाही. संगणक चालकांच्या वेतनाबाबत अडचण येऊ नये म्हणून आपण निर्वाळ्यासाठी हा विषय घेतलेला आहे.

**जयंत पाटील :-**

मंजुरीसाठी नाही. यासाठी शासनाची मंजुरी आहे की नाही. आपल्याला शासनाकडून मार्गदर्शन पाहिजे. या गोषवाऱ्यामध्ये मार्गदर्शग शब्द आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण मा. महासभेमध्ये जो केला तो मंजूरीसाठी केला.

**जयंत पाटील :-**

मार्गदर्शन चा अर्थ असा होतो की, आम्हाला फक्त डायरेक्शन पाहिजे. मंजूरी होत नाही. टेक्निकली तुमचा शब्द चुकीचा असेल तर बदलून घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.)**

मान्यता मिळण्या अपेक्षा आधी पेन्डीग होता. त्याला अजून मान्यता मिळालेली नाही. म्हणून त्यांच्या वेतनाची अडचण नये. म्हणून हा ठराव मंजूर करु.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही जे शासनाकडे पाठवले त्यांचीही गरज आहे. ठेकेदाराकडे आहेत तेही काम करत नाही. त्यामुळे लागणार आहे हे आम्हाला माहित आहे. आणि तो एक पार्ट होता. वन थर्ड बोला वन फिफ्थ बोला असा एक पार्ट होता. त्यांची तुम्ही शासनाकडे मान्यता मागितले. हे तर तुम्हाला लागणारच होते. मग, एक महिना लेट आले. ह्याच्यात कुठे ही असे नाही की, प्रशिक्षित कर्मचारी आपल्या संगणकमध्ये किती काम करतात. आपल्या महापालिकेत प्रशिक्षित किती आहेत ते सुद्धा माहित पडत नाही. प्रस्ताव कितीचा आहे. तेही तुम्ही दिले नाही. आता, ठेकेदाराचे किती कर्मचारी काम करतात? ते सुद्धा नाही. किती लोकांना आपण परवानगी द्यायची आहे. सगळ्या ठिकाणी संगणक- संगणकचालक काम करतात सविस्तर द्या सर्व रेकॉर्डला येउ द्या किंवा महापालिकेने संधी देवून प्रशिक्षित झालेले संगणक कर्मचारी एवढे.

**विजय पाटील :-**

५५ संगणक कर्मचारी आहेत.

**रोहिदास पाटील :-**

५५ संगणक कर्मचारी कोणते?

**विजय पाटील :-**

५५ कर्मचारी ठेकेदाराचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

५५ कर्मचारी ठेकेदाराचे म्हणजे आम्ही मुदतवाढ ठेकेदाराचे ५५ कर्मचाऱ्यांना देतो. बरोबर आहे ना. मग, आपण जो प्रस्ताव पाठवला तो किती कर्मचाऱ्यांना पाठवला? तो सुद्धा ५५ आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

जास्त आहेत.

**जेन्वी अल्मेडा :-**

जास्त आहे. ७२ आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, जरा आपण खुलासा करावा. जर ५५ ठेकेदाराचे कर्मचारी आपण नेमलेले आहेत. मग, ७२ लोकांच्या परमिशनसाठी कसे काय केले?

**जयंत पाटील :-**

बाकिचे पालिकेचे आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

बाकीचे कमर्चारी पालिकेचे नाहीत, बाहेरचे आहेत.

**रोहिदास पाटील :-**

ही सभा तुम्हाला कुठेही प्रशासनाला अडचणीत आणणार नाही. पण, प्रशासनानी सभेला माहिती तरी द्यायला पाहिजे. सगळे, जमेकरुन तुम्ही का करतात. ५५ चे ७२ केले. तर ७२ चा ठराव दिलेला आहे हे सांगायला तरी पाहिजे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

आपल्याला ५५ कर्मचाऱ्यांना मुदतवाढ द्यायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता ५५ कर्मचाऱ्यांना द्यायची आहे. आम्ही विचारतो प्रस्ताव कितीचा पाठवलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

ठेक्याच्या पक्षांवरती जे कार्यरत आहे. त्यांना आपण मुदतवाढ देतो.

**मा. सभापती :-**

पाटील साहेब, मी सांगितले की, आधी नियमाचे आपल्याला दिसते. मंजूरी लवकर मिळत नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

७२ च्या मंजूरी देवून टाका.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, आपल्याकडे कॉम्प्यूटर वाढत चालले आहेत आणि आपल्याकडे ८५ कॉम्प्यूटर आहेत.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेत काम करण्यासाठी पी.सी. किती आहेत?

**जयंत पाटील :-**

काका प्रश्न असा आहे की, हा विषय मा. महासभेमध्ये ठराव झालेला आहे. मा. महासभेच्या ठरावाला स्थायी समिती विरोध करु शकते का?

**रोहिदास पाटील :-**

ठेका मा. महासभेने रद्द केला आहे.

**जयंत पाटील :-**

त्याच्यात दिलेले आहे. तुम्ही वाचा. मा. महासभेच्या ठरावाला स्थायी समिती विरोध कशी काय करणार? आपण मा. महासभेचा ठराव वाचून दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मी, ह्या बाबतीत खुलासा करतो. आपल्याकडे ५५ संगणक चालक गेल्या वर्षभरात ठेका पद्धतीने आपल्याकडे कार्यरत आहे. संबंधित चालकांना ठेकेदारामार्फत पगार मिळतो. त्यामध्ये ते ठेकेदार स्वतःचे प्रॉफिट कामगार सहाय्यक आयुक्तांकडे काही फी भरावी लागते आणि त्यांची भविष्य निर्वाह निधी असे निर्देश करुन त्यांना वेतन देतात. हे महापालिका वेतन देते.

**रोहिदास पाटील :-**

३,९०० रु. देत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

देत नाही. ही वस्तुस्थिती आहे. म्हणून संबंधित सर्व वर्कस्, सन्मा. सदस्यांना, मा. सभापतींना अप्रोच्च झाल्यानंतर यांना मानधनावर आपल्याकडे घेता येईल का? अशी चर्चा झाली. नियमाप्रमाणे डायरेक्ट कोणाला सुद्धा वेतनावर पद मंजूर करुन घेता येत नाही. म्हणून मा. महासभेने या मध्ये त्यांना मानधनावर ठेवावे. आणि सदरचा ठेका रद्द करावा. असा धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. पण, त्याची अंमलबजावणी करता येत नव्हती. कारण, आपली ही पदे मंजूर नव्हती. म्हणून हा विषय मा. महासभेनंतर शासनाकडे सादर केलेला आहे. आणि ते प्रलंबित आहे. आम्हाला अजून फायनल निर्णय मिळालेला नाही. दरम्यानच्या काळामध्ये यांची मुदत संपत आलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

संपली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

आम्ही सादर केली. तेव्हाची बाब सांगतो. आणि पुढे ते काम आपल्याला गरजेचे आहे. जरी, महापालिकेने हा ठेका रद्द केला. मग, एकतर नव्याने ठेका करायला लागेल. किंवा आहे त्या ठेकेदाराला मुदतवाढ द्यावी लागेल. ही वस्तुस्थिती आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, असे आहे की, तुम्ही निविदा काढू शकत नाही. महापालिकेचा जो ठराव आहे. त्या ठरावानुसारच तुम्हाला चालावे लागेल. तुम्ही ना. महासभेचा ठराव बघा. ठेका रद्द करुन त्यांना आस्थापनेवर घ्या. मग, हा विषय तुम्ही पुन्हा मा. महासभेला पाठवा.

**मा. सभापती :-**

मा. महासभेने ठराव केला.

**जयंत पाटील :-**

साहेब, मग त्याच्यावर स्थायी समिती निर्णय कसा काय घेणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मा. महासभेच्या ठरावाची प्रशासनाकडून पूर्ण अंमलबजावणी करता येत नाही. त्यामध्ये प्रशासकीय अडचणी आहे.

**मा. सभापती :-**

त्यांची मंजूरी आल्याशिवाय आपण कशी ठरावावर काही केले...

**जयंत पाटील :-**

तुम्ही आम्हाला आपलं मत सांगा की, मा. महासभेच्या ठरावाच्या विरोधात स्थायी समिती निर्णय घेवू शकतो का?

**मा. सभापती :-**

त्यांनी काय सांगितलेले आहे.....

**जयंत पाटील :-**

मी ठराव वाचतो.

(सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांनी मा. महासभेतील ठरावाचे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

महापालिकेने ठराव केलेला आहे. मग, त्या ठरावाप्रमाणे आपल्याला चालावे लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मी आपल्याला माहिती देवू इच्छितो तो जो ठराव मा. महासभेने केलेला होता. प्रशासकीय रिकॉम्डेशन त्याच्यात काही नव्हते. मा. महासभेने स्वतःच्या अजेंड्यावर विषय मा. महापौरांनी घेतला होता. त्या ठरावावर चर्चा झालेली होती.

**जयंत पाटीलः-**

ठराव तर झालेला ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

आणि त्या मागची भुमिका एकच होती की हे जे वर्कस् आहेत. त्यांना करेक्ट बेनिफिट भेटायला पाहिजे. साहेब, मी हे फॅक्ट सांगतो.

**जयंत पाटील :-**

प्रश्न त्यांच्या भुमिकेचा नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

त्या ठरावाची अंमलबजावणी करता.....

**जयंत पाटील :-**

मला, फक्त प्रश्न एवढाच पाहिजे की, तुम्ही तुमचे मत सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मी माझेच मत सांगतो

**जयंत पाटील :-**

की, महापालिकेच्या ठरावात आम्ही विरोध करु शकतो का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

विरोधात नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील मा. महासभेने ठराव केल्यानंतर तो प्रशासनाकडे आपण मंजूरी साठी पाठवलेला आहे. आता, शासनाची मंजूरी येईपर्यन्त लोक आपल्याकडे आहे.

**जयंत पाटील :-**

त्यामध्ये एक महिना लागेल का?

**मा. सभापती :-**

हो. आपण परमन्टचा ठराव केलेला आहे. पण, आता आपल्या तात्पुरती सेवेत आहे ना त्यांना आपल्याकडून पगार जातो ना. मग, ठराव नको का? मुदत वाढून देतो म्हणजे मा. महासभेच्या ठरावाला अनूसरुन आपण मुदतवाढ देतो. शासनाकडे आपण ठराव मंजूरीला पाठवला की नाही. नगरपालिकेच्या प्रशासनानी.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही सुद्धा अनुसरुनच आहेत. त्याच्यात तांत्रिक अडचणी पाहता. या ठरावामध्ये तांत्रिक अडचणी आहे ते अधिका-यांना दाखवा.

**मा. सभापती :-**

तुमची आमची भावना अशी आहे की ते परमनन्ट झाले पाहिजे. तो निर्णय येईपर्यन्त सध्या त्यांना हाकलायचे का? म्हणून त्यांना मंजूरी द्यायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण, आता खतगांवकर साहेब काय बोलले की, महासभेने सुमोठो विषय घेवून पास केलेला आहे. जर तो विषय प्रशासनाने दिलेला नाही. मग, तो ठराव प्रशासनाने कॅन्सल केला पाहिजे होता. मग, हा ठराव तुम्ही कॅन्सल का नाही केला?

**मा. सभापती :-**

कसे कॅन्सल करतील?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

का? जर मा. महासभेने ठराव पास केला आणि तुम्ही ५५ कर्मचा-यांच्या ऐवजी ७२ लोकांना तुम्ही ठराव पास करतात. मग, तुम्ही तो ठराव रद्द केला पाहिजे होता. तसे तुम्ही म्हणाले, तर ह्याच्यामध्ये तुम्ही लिहायला पाहिजे होते की, मा. महासभेने तात्पुरता ठराव दिलेला आहे. आणि प्रशासनाने हा ठराव ॲक्सेप्ट केलेला नाही.

**मा. सभापती :-**

ॲक्सेप्ट केला. म्हणून शासनाकडे पाठवला.

**जेन्वी अल्मेडा :-**

शासनाने मंजूर केला नाही की, अजून मंजूर होवून आलेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.):-**

भविष्यात शासनाने मंजूर केला तर मुदतवाढ रद्द केली जाईल. शासनाने जर मान्यत्ता दिली नाही तर त्याची अंमलबजावणी होणार नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

मग, तसे मांडा ना की, मंजूर होईपर्यन्त त्यांना मुदतवाढ दिली जाते.

**जयंत पाटील :-**

माझा विषय काय आहे. तुम्हाला ही कल्पना आहे. मुदतवाढ करणार आहे. त्याला माझा विरोध नाही. काका तुमचे मत काय आहे? नंतर बोर्ड लावाल तिकडे अगोदर बोला.

**रोहिदास पाटील :-**

माझा विषयाचे तुम्ही नीट उत्तर दिलेले नाही. प्रशिक्षित कर्मचारी म्हणून आपले संगणक चालक किती आहेत?

**मा. सभापती :-**

तुमचा विषय दुसरा येतो.

**रोहिदास पाटील :-**

परमनन्ट स्टाफला ज्यांना आपण प्रमोट केलेले आहे. त्यांना आपण संधी दिली. महापालिकेच्या खर्चात त्यांना शिकवले अशांची संख्या किती?

**मा. सभापती :-**

तुम्ही तसे सांगितल्यानंतर जे परमनन्ट लोक आहेत. मग, ठेकेदारीवर पाठवायचा विचार आहे काय?

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यासाठी नाही. मला कोणीतरी त्याचा फिगर द्यावा ना. पी. सी. किती आहे? जो फिगर अजून चुकीचा आहे. आपली जी स्थायी आहे. स्थायी पैकी संगणक प्रशिक्षित झालेले किती? ते काम किती करतात? परमनन्ट आहेत. त्यांना आपण शिकवले आणि ते कॉम्प्यूटर चालवायला लागले ते किती?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.):-**

महापालिकेचे प्रशिक्षित आहे. त्यांना पगार रेग्युलर आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही पगाराची गफलत करु नका. माझा प्रश्न असा आहे की जे संगणक म्हणून शिक्षित होवून आले. ज्यांना महापालिकेने संधी दिली. ते किती संगणक प्रशिक्षित झाले ती संख्या? आणि शिक्षित किती आहेत ती संख्या? आता आपल्याकडे असलेले संगणक किती आहेत? ठेकेदाराकडे किती काम करतात ते आणि प्रस्ताव किती केला? ह्याचा तुम्ही कुठेतरी बोर्डावर आणाल की नाही? साहेब, आस्थापनेतला भाग आहे. तुम्ही आणा. ह्याच्यात काही शोधाशोध नाही, खोदाखोद नाही, काहीही नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

त्याच्यात दोन बाबी आहेत.

**जयंत पाटील :-**

तिथे आता एकूण किती कर्मचारी आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

प्रशिक्षित म्हणजे शासनमान्य प्रमाणपत्र.

**जयंत पाटील :-**

तिथे एकूण किती कर्मचारी आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपल्याकडे महानगरपालिकेच्यापूर्वी नगरपालिका होती. सफाई कामगार पासून ते अधिका-यांपर्यंतची सर्व माहिती आपल्याला ज्ञात आहे. आपला रिक्युपमेन्ट कॉम्प्युटर बेस ह्याच्यापूर्वी कधी झाला नव्हता. ही वस्तुस्थिती आहे. पण शासन धोरणाप्रमाणे जे कार्यरित कर्मचारी आहेत त्यांना शासनाचा जो सर्टीफिकेट कोर्स आहे, तो आम्ही कम्पलसरी करुन घेतलेला आहे. सर्टीफिकेट पास झाले म्हणजे ते प्रशिक्षित आहत अशी आपली प्रॅक्टीकल धारणा होत नाही. म्हणजे सर्व प्रकारचे त्यांना ज्ञान येवून ते सर्व कार्यक्षम होतील. म्हणजे ते प्रयत्न करतात. पण त्या लेव्हलचा अजुन आत्मसात केलेला नाही का? म्हणून ५५ लोक आपण ठेका पध्दतीने ॲंगेज केलेले आहेत आणि अनुषंगाने भविष्यात लागणारे विषय ज्यावेळेस मा. महासभेला आला त्यावेळेस ७१ लोकांची सुची तयार केली.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, माझी तुम्हाला एवढी विनंती आहे की, फिगर किती आहे ते तुम्ही मला सांगा?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

५५.

**रोहिदास पाटील :-**

ती नाही. आपले महापालिकेचे स्थायी कर्मचारी ज्यांनी संगणकाचे प्रशिक्षण घेतले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

प्रमाणपत्र परिक्षा पास झालेले

**रोहिदास पाटील :-**

हो. ते लोक किती आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी तुम्हाला ती माहिती देतो. जवळपास आपल्याकडे वर्ग-३ पासुन सर्व आहेत. ते सर्व ३०० च्या जवळपास आहेत. ते सर्व लिपिक पास झालेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

ते काय काम करतात? त्यांना लागणारे संगणक, ह्यांना लागणारे संगणक त्याचा कुठेतरी ताळमेळ जुळणार की नाही? तुम्ही आम्हाला फिगर देणार. स्थायी समिती तुम्हाला परवानगी देईल. हा विषय कुठे चालला? कुठेतरी एक टिपणी द्यायला पाहिजे ना. तुम्ही आता म्हणतात की, ८५ संगणक आहेत. एका संगणकावर किती लोक काम करणार?

**दिपक खांबित :-**

साहेब, आपल्याकडे सी.एफ.सी. आहे ना. तिकडे तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

**रोहिदास पाटील :-**

तीन पाळ्यांमध्ये?

**दिपक खांबित :-**

तीन पाळ्यांमध्ये लोकांचे काम करतात. संगणक चालक आजच्या डेटला तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

**रोहिदास पाटील :-**

घरपट्टीचे काम करत असल्यामुळे शेवटच्या दिवशी लोकांची तुम्ही अडचण करुन ठेवतात. तुमची बिलं टाईमच्या आधी पोहचले का? हे तुमच्या घरपट्टीच्या अधिकाऱ्यांनी सांगावे. तुमचे नियमानुसार घरपट्टीच्या वेळी.........

**जयंत पाटील :-**

काका, विषय कोणता चालला आहे आणि तुम्ही कोणते बोलता. विषय असा आहे की, आपण शासनाकडे ठराव मंजुरीला पाठवलेला आहे. त्या ठरावावर किती जणांची नावे टाकलेली आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

महापालिकेने मंजुरी दिलेला जो ठराव आहे तो ठराव आम्ही शासनाकडे पाठवला.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे तो ठराव आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

७१ ची संख्या आहे.

**जयंत पाटील :-**

मग तुम्ही म्हणता ५५ लोकांच्या मंजुरीसाठी आहे. मग ७१ लोक आले कुठून? ५५ लोक म्हणता म्हणता ७१ आले कुठून?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

७१ पैकी ५५ कार्यरत आहेत.

**शशिकांत भोईर :-**

एक प्रश्न असा सुचवितो की, ७१ पदांना मंजुरी मिळाली तर ७१ जणांची नांवे गेली असणार. आणखिन जे आहेत ते डायरेक्ट महापालिकेच्या कामाला येतील.

**मा. सभापती :-**

१६ लोकांचा प्रश्न काय आहे?

**शशिकांत भोईर :-**

आता, त्याला मंजुरी द्या ना.

**मा. सभापती :-**

७१ ची मंजुरी बघा. १६ जण एक्स्ट्रा आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

अप दि रेकॉर्ड सांगु हे मंजुर होणार नाही. हे ५५ वाढले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ती नंतरची गोष्ट आहे. साहेब, तुम्ही जो ठराव पाठवला तर तो ठराव रद्द करतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

अप द रेकॉर्ड तुम्ही ह्याला मान्यता द्या. तो विषय रद्द झाला. शासनाने तो विषय फेटाळला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही शासनाला पत्र द्या की, तुम्ही हा विषय का फेटाळला म्हणून.

**दिपक खांबित :-**

त्यांनी पद मंजुरीचा विषय फेटाळला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही मान्यता द्या.

**जयंत पाटील :-**

मान्यता दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

मान्यता दिलेली आहे पण १६ लोकांची आहे. ते १६ नको एक-एक घ्या. असे त्यांचे म्हणणे आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ५५ लोकांचे कशाला मागता?

**ग्रिटा फॅरो :-**

७२ असु दे.

**रोहिदास पाटील :-**

५५ ला मंजुरी कशाला मागतात. ५५ ने ह्यांची भुक भागेल का? आम्हाला अंधारात ठेवू नका. आम्ही तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगतो.

**मा. सभापती :-**

जे कायदेशीर ठरलेले आहे तेवढ्यांनाच म्हणजे ५५ लोकांनाच मंजुरी देतो. पगार पण आपण तेवढ्यानांच देतो तर आपण एक्स्ट्रा १६ लोकांना पगार देणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा विषय आपण चेष्टेवर नेत नाही. कामकाजातही व्यत्यय येवू नये. आता एक महिना गेला. हा ठेका किती मुदतीचा होता आणि आपण वाढवले किती? पाच महिन्यासाठी वाढवतो ना. त्याचे कामकाज पाच महिने वाढते की नाही. परत गरज लागते ना. मग ते ५५ चे ८५ करुन द्या. ठेकाच आहे ना. ८५ लोकांची मंजुरी द्यायला हरकत काय आहे? ठेकदाराची आजच्या वेळेला ५५ माणसं आहेत. आपल्याला गरज ८५ ची आहे असे गृहीत धरा. ८५ ला मंजुरी देवू. पुन्हा पुन्हा अडचण कशाला करता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आमची अडचण नाही आणि जर आमची अडचण असेल तर आम्ही तुमच्याकडे येतोच. महापालिकेने जो ठराव केला होता त्या ज्या संख्या आल्या त्याची प्रशासनाने अजुन छाननी केली नाही. सदरचे धोरण अंमलबजावणीच्या अनुषंगाने जी मंजुरी लागते. त्याच्यासाठी आम्ही शासनाकडे तो रेफर केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता तो विषय राहिला बाजुला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

७१ लोक रिकंमड केलेले होते असे नाही. मा. महासभेमध्ये कशी संख्या आली ते प्रशासन तपासुन घेईल. असे आहे की आपल्याकडे ५५ लोक कामात आहेत आणि महासभेच्या धोरणामुळे त्यांच्या भविष्यातील कामकाजामुळे आणि आमच्या प्रशासकीयची अडचणीत ची बाब विचारात घेता हा प्रस्ताव आम्ही आणलेला आहे. यावर स्थायी समितीने निर्णय घ्यावा. अशी माझी विनंती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, सगळ्या सदस्यांच्या सुचनेनुसार आपण जो ठराव केला होता. त्या ठरावामध्ये थोडस ॲड करायचे. आपल्या पालिकेमध्ये भरपुर विभाग आहेत. त्या सगळ्या विभागाच्या आवश्यकतेनुसार आपले जे ५५ संगणक चालक आहेत. त्याच्यामध्ये आणखिन ३५ जणांची वाढ करुन एकूणण ८७ संगणक चालकांना आपण मंजुरी देवू या. असे मी सुचवतो.

**शशिकांत भोईर :-**

अनुमोदन आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

८७ पर्यंत आवश्यकतेप्रमाणे.

**दिपक खांबित :-**

जेव्हा त्यांना आवश्यकता लागणार तेव्हा त्यांना बोलावणार आहे.

**प्रकरण क्र. ८५ :-**

महानगरपालिका विविध विभागांकरिता संगणक चालक ठेका पद्धतीने नेमणेस मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ८७ :-**

महानगरपालिका विविध विभागांकरिता संगणक चालक ठेकापद्धतीने घेणे कामी वार्षिक निविदा मंजुर असून सदर कामी दि. ३०/०७/२००५ रोजी करारनामा केलेला आहे. सदर करारनाम्यानुसार ठेकापद्धतीने

संगणक चालक पुरवठा करणे कामाची मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांची मुदत दि. ३१/०७/२००६ रोजी संपत आहे. दरम्यान मा. महासभा ठराव क्र. २९ दि. २०/०६/२००६ अन्वये सदर ठेका रद्द करून संगणक चालकांची आस्थापनेवर रू. ३९००/- प्रति महिना (२६ दिवसांकरिता) वेतनावर नेमणूक करणेस मान्यता दिली आहे. तथापी सदर ठराव मार्गदर्शनाकरीता शासनाकडे पाठविलेला असून त्यावर अद्याप अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

सदर कामी मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांनी मंजुर दराने यानंतरही संगणक चालक पुरवठा करणेची तयारी दि. २६/०६/२००६ चे पत्रानुसार दर्शविलेली आहे.

वरील गोषवारा पाहता मा. महासभा दि. २०/०६/२००६ ठराव क्र. २९ मध्ये नमूद केल्यानुसार ७१ संगणक चालक व इतर विभागाच्या आवश्यकतेनुसार असणारे एकूण ८७ संगणक चालकांना शासनाकडील आदेश प्राप्त होऊन नेमणूक देईपर्यंत मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांचे कडील मंजूर दराने दि. ०१/०८/२००६ पासून पुढील पाच महिन्याकरीता करारनामा करून नेमणूक करण्यास व खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिव श्री. विजय पाटील यांनी प्रकरण क्र. ८६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या सौ. ज्युडी डिसोझा यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही वाचले काय? यातली टिपणी वेगळी वाचली. ठराव वेगळा वाचला. ठराव पुन्हा वाचता का?

**जयंत पाटील :-**

२००१ मे पर्यंत होता. म्हणजे हा ही विषय आपल्याकडे उशीरा आला.

**रोहिदास पाटील :-**

जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर चार महिने आणखीन झाले.

**जयंत पाटील :-**

चार महिने वाढले.

**रोहिदास पाटील :-**

तीन महिन्याचे पैसे आपण द्यायचे नाही. ह्याचे रिकंमडेट काय आहे? करार काय आहे?

**जयंत पाटील :-**

करारमधल्या अटीशर्ती काय होत्या?

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी काय केलेले? अटीशर्तीचे काय केले?

**जयंत पाटील :-**

त्यांनी आपल्या अटीशर्तीच उल्लंघन केलं. कराराचे त्यांनी उल्लंघन केलेले आहे. सहा महिन्यामध्ये त्या अटीशर्ती पूर्ण करायच्या होत्या. त्या पूर्ण केलेल्या नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

प्रशासनाची यांच्यावर स्पष्ट भुमिका मांडा. त्यांनी करार कुठपर्यंत केलेला होता. कराराची मुदत संपल्यानंतर तीन महिने जास्त झाले.

**जयंत पाटील :-**

झालेले नाही. आम्हाला गोषवाऱ्यात काय दिले की, त्याची अद्यापपर्यंत सर्व कामाची पुर्तता झालेली नसुन हा ठराव आहे की, गोषवारा आहे? पुर्तता झालेली असेल तर ठराव करायची गरज नाही.

**मा. सभापती :-**

माझ्या ठरावामध्ये असून दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

ठराव करताना तुम्ही असे का करता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

पाटील साहेब, आपण आपल्या महापालिकेला कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे सॉफ्टवेअर घेतलेले आहे. आपण जर नव्याने प्रणाली केली तर आपल्याला कोटी रुपयांमध्ये खर्च झाला असता. पण त्याची जी

रॉयल्टी आहे. शासनाने निश्चित केल्याप्रमाणे देवून ते सॉफ्टवेअर आपण आपल्याकडे घेतलेला आहे. सदर सॉफ्टवेअरचे जे टेक्नीकल एक्सपर्ट आहेत ते सुध्दा आपण त्यांच्याकडून घेतलेले आहे आणि त्याची मुदत ३१ मे पर्यंत होती. मागच्या करारनाम्याप्रमाणे तर त्यांनी आपल्याकडे जे ॲग्रीमेन्ट केलेले आहे. त्याच्यातल्या सर्व बाबी त्यांना पूर्ण केलेल्या आहेत. पण आपल्याकडे लॅन आणि वॅन हे जे कनेक्टीवीटी आहे ते सर्व प्रभागाशी डायरेक्ट ऑन लाईन बील होण्याची त्याची कार्यन्वीत आतापर्यन्त झाली नव्हती. आणि आता आपण ती पुर्ण केलेली आहे. त्यासाठी आवश्यक असलेले हार्डवेअरची सुद्धा आपण मागणी केलेली आहे. आज पेपरला सुद्धा जाहिरात दिलेली आहे. १५ पी.सी. एकदा तिथे कार्यन्वीत झाल्या तर ते टेस्टेड होणे बाकी आहे. म्हणजे त्याच्या भविष्यात अडचणी येवू नये म्हणून ह्याची सहा महिन्याची सेवा आपण वर्निगत करतो. त्याच्यासाठी आपण कल्याण डोंबिवलीला महिन्याला १ लाख ८६ हजार रु. त्यांना देतो. तर काही टेस्टींग पूर्ण झालेल्या नाहीत. म्हणजे ॲक्च्युअल त्यांनी पूर्ण सेट अप केलेला आहे. पण, उद्या आपण जे चालू केल्यानंतर काही फॉल्ट आहे तर त्यांना आपण हक्काने बोलू शकु. यासाठी आपण सहा महिन्यासाठी ही सेवा कार्यान्वीत करतो. आणि त्याच्यापुढे आपण त्यांचे टेक्नीकल ॲक्सपर्ट घेणार नाही.

**जयंत पाटील :-**

आजपासून सहा महिने की.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

नाही. ३१ मे पासून येणाऱ्या तीन महिन्यात आम्ही हे पूर्ण करुन घेवू आणि ह्याच्यानंतर परत ह्याची गरज भासणार नाही.

**मा. सभापती :-**

सर्वांनुमते ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८६ :-**

e-Governance करिता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून तांत्रिक सेवेकामी केलेला करार वृद्धींगत करणे.

**ठराव क्र. ८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात सर्व विभागांसाठी ची अज्ञाप्रणाली कार्यरत आहे. या द्वारे मुख्यत्वेकरून मालमत्ता कराची बिलं व जन्म मृत्यु दाखले ही महत्वाची कामे महानगरपालिकेला वार्षिक ४० कोटी महसूल मिळवून देणारी कामे होतात. कडून माहे डिसेंबर २००५ पासून ३१ मे २००६ पर्यंत अशी सेवा घेण्यात आली. सदर कामी करारनामा करणेंस आला असून करारनाम्यानुसार कामांची पुर्तता झाली आहे. महानगरपालिकेस विभागीय कार्यालये संगणकीकृत करावयाची आहेत. त्याकामी व नागरी सुविधा केंद्रासया आज्ञाप्रणालीची आवश्यकता लागणार आहे. सदरकामी झालेला करार १ जून २००६ ते नोव्हेंबर २००६ पर्यंत वाढवून देण्यास तसेच या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्रभारी सचिव श्री. विजय पाटील यांनी प्रकरण क्र. ८७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या सौ. जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. ८७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

एक करोड रुपये बाकी आहेत ना. तुमच्या पाईप लाईनचा प्रत्येक वेळी विषय येतो. आम्ही मंजूरी देतो. पण, पाण्याची व्यवस्था तुमची सुधारत नाही. लोकांना खुप प्रॉब्लेम आहेत.

**प्र. सचिव (विजय पाटील) :-**

हे दोन विषय मंजूर झाल्यानंतर या दोन विषयावर चर्चा झाल्यानंतर पाणीपुरवठा विषयावरती १५ मिनीट चर्चा करुया.

**प्रकरण क्र. ८७ :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८९:-**

**पाणी पुरवठा विभागासाठी दैरंदीन देखभाल / दुरूस्तीसाठी हत्यारे व औजारे पुरवठा करणे.**

मिरा भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणेसाठी १०० मि.मी. ते ६०० मि.मी. व्यासाच्या बिडाच्या जलवाहिन्या असून काही विभागात अजूनही जी. आय. व सिमेंटच्या जलवाहीन्या असून सुमारे २०० ते २५० कि.मी. एकूण लांबीच्या जलवाहिन्या आहेत. सदरच्या जलवाहिन्यामार्फत नागरीकांना पाणी पुरवठा करणेत येतो. दैनंदिन देखभाल / दुरूस्ती अद्याप महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून करून घेण्यात येत आहे. वारंवार जलवाहिन्या फुटणे, गळती होणे, रस्त्यांची व नाले सफाईची कामे चालू असताना जलवाहिन्या तुटणे असे प्रसंग वारंवार होत असतात. म्हणून पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेसाठी तातडीने दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे असल्याने पाणी पुरवठा विभागात चार विभागासाठी (मिरारोड, भाईंदर (पु.), भाईंदर (प.), व राई मुर्धा उत्तन) हत्यारे व औजारे खरेदी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त साहित्याचे दर जिल्हा दरसुचीत नसल्याने बाजारभावाचे दर घेउन अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून सदर साहित्य खरेदीसाठी रू. २२,१५,०१९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर खर्चाची तरतुद मनपा सन २००६-०७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ''साहित्य खरेदी'' (रु. १००.०० लक्ष) लखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे.

तरी सदर खर्चास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- सौ. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिव श्री. विजय पाटील यांनी प्रकरण क्र. ८८ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

प्रकरण क्र. ८७ चे काय केले ?

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८७ मंजूर झाला.

**रोहिदास पाटील :-**

२२ लाख रु. ला मंजूरी दिली.

**नगरसचिव :-**

हो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या सगळ्या निविदा दिलेल्या आहेत. त्या निविदा पाण्याच्याच आहे ना.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ८८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ८८ :-**

निविदांस मंजुरी देणे (पाणीपुरवठा विभाग)

**ठराव क्र. ९० :-**

१) दि. ०४/०८/२००६ रोजीच्या दै. नवशक्ती व दै. सुरज प्रकाश yaa vaR<ap~aMt p`isaQd krNyaat Aalaolyaa जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र.६) प्राप्त निविदा idnaaMk १४/०८/२००६ raojal ]GaDNyaat Aalyaa. %yaabaabatcaa tpSalla KalaIlap`maaNa Aaho.

**सी.आय. (मॅकेनिकल फिटिंग व जॉईंटस) आय.एस. नं. १३३८२-१९९२ आणि समकक्ष आय.एस.ओ. / बी. एस. स्टॅंडर्ड प्रमाणे पुरवठा करणे. (अंदाजित रक्कम रू. २४,७३,१६९/-)**

| | <u>**zokodaracao naava**</u> | **निविदेचा दर** |
|---|---|---|
| १) | **मे. केशरी अँड कंपनी** | **०.९७% कमी** |
| २) | **मे. विंध्या ट्रेडर्स** | **०४.०३% ज्यादा** |
| ३) | **मे. श्री गौरव ट्रेडर्स** | **०९.०९% ज्यादा** |

२) दि.०४/८/२००६ रोजीच्या दै. दी फ्री प्रेस जर्नल व दै.सुरज प्रकाश yaa vaR<ap~aMt p`isaQd krNyaat Aalaolyaa जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र. ८) प्राप्त निविदा दिनांक १४/०८/२००६ raojaI ]GaDNyaat Aalyaa. %yaabaabatcaa tpSaIla KalaIlap`maaNa Aaho.

**डोगरी पंपीग स्टेशन वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.**
**(अंदाजित रक्कम रू. ७,३४,७९६/-)**

| | **zokodaracao naava** | **inaivadocaa dr** |
|---|---|---|
| **१)** | **मे. साई वीणा एन्टरप्राईजेस** | **३% ज्यादा (वाटाघाटीअंती २.५% ज्यादा)** |
| २) | मे. ॲकॉर्ड मार्केटिंग अँड सर्विसेस | ३.६०% ज्यादा |
| ३) | मे. गुरूजी कंस्ट्रक्शन | ३.६०% ज्यादा |
| ४) | मे. एस.एन. एन्टरप्राईजेस | ४.२५% ज्यादा |

३) दि. ०४/८/२००६ रोजीच्या दै. दी फ्री प्रेस जर्नल व दै.सुरज प्रकाश yaa vaR<ap~aMt p`isaQd krNyaat Aalaolyaa जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र. ८) प्राप्त निविदा दिनांक १४/०८/२००६ raojaI ]GaDNyaat Aalyaa. %yaabaabatcaa tpSaIla KalaIlap`maaNa Aaho.

**पाली व लाईट हाउस पंपीग स्टेशन वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.**
**(अंदाजित रक्कम रू. ९,१२,९९६/-)**

| | **zokodaracao naava** | **inaivadocaa dr** |
|---|---|---|
| **१)** | **मे. साई वीणा एन्टरप्राईजेस** | **०३.००% ज्यादा (वाटाघाटीअंती २.५%ज्यादा)** |
| २) | मे. ॲकॉर्ड मार्केटिंग अँड सर्विसेस | ०३.५०% **ज्यादा** |
| ३) | मे. गुरूजी कंस्ट्रक्शन | ३.८०% **ज्यादा** |
| ४) | मे. एस.एन. एन्टरप्राईजेस | ४.५०% **ज्यादा** |

४) दि. ०४/८/२००६ रोजीच्या दै. सागर व दै.सुरज प्रकाश yaa vaR<ap~aMt p`isaQd krNyaat Aalaolyaa जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र. ७) प्राप्त निविदा दिनांक १४/०८/२००६ raojaI ]GaDNyaat Aalyaa. %yaabaabatcaa tpSaIla KalaIlap`maaNa Aaho.

**भाईंदर पश्चिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग येथे क्रॉस कनेक्शन करणे. व सी.सी. चेंबर बांधणे. (अंदाजित रक्कम रू. २,३२,५११/-)**

| | **zokodaracao naava** | **inaivadocaa dr** |
|---|---|---|
| **१)** | **मे. एस.एन. एन्टरप्राईजेस** | **०२.६०% ज्यादा (वाटाघाटीअंती २.१०%ज्यादा)** |
| २) | मे. संदेश डी बुटाला | ०४.८२%ज्यादा |
| ३) | मे. योप्राम कंस्ट्रक्शन | ०६.३२% ज्यादा |

उपरोक्त निविदांचा तुलनात्मक तक्ता पाहता अनुक्रमांक १ च्या कामाकरीता **मे. केशरी अँड कंपनी** यांची **०.९७% कमी दराची,** अनुक्रमांक २ च्या कामाकरीता **मे. साई वीणा एन्टरप्राईजेस** यांची **२.५% ज्यादा दराची,** अनुक्रमांक ३ च्या कामाकरीता **मे. साई वीणा एन्टरप्राईजेस** यांची **२.५% ज्यादा दराची व** अनुक्रमांक ४ च्या कामाकरीता **मे. एस.एन. एन्टरप्राईजेस** यांची **२.१०% ज्यादा दराची** निविदा लघुत्तम आहे. सबब उपरोक्त दर वाजवी व संयुक्तिक असल्याने वरील लघुत्तम निविदा मंजुर करणेस व याकामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. हंसुकुमार पांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिव श्री. विजय पाटील यांनी प्रकरण क्र. ८९ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

अवलोकनावर चर्चा कशाला करतात? प्रकरण क्र. ८८ आणि ७९ ह्यानंतर जोडून चर्चा करा आणि नंतर त्यांना १५ मिनिटाची चर्चा काय करायची ते करु द्या. प्रकरण क्र. ८८ मध्ये जे २४ लाख रु. चे काम काढलेले आहे ते आयटम काय आहे. ते काय आहे ते तरी समजू द्या. ४४ लाखाची ह्याच्यात कशात ती खरेदी आहे? आणि काय आहे? आम्हाला पण समजते तुम्ही पाणी पुरवठ्याचे अधिकारी आहात. सभेचे कामकाज अजून बाकी आहे ना त्या दिवशीच्या नंतर तुम्ही विसर्जनाची काय-काय तयारी केली. तुम्हाला नियोजन नको करायला असे कसे? मग, अशा सभा आपल्या अनेक होतील. मा. सभापती साहेब, तुम्ही घाई करु नका. जे अति महत्त्वाचे असेल त्याचा तुम्ही ही अभ्यास करुन यायला पाहिजे. नाहीतर सभापती आले. ह्यांच्या ऐवजी ते आणि ती लगेच उठून गेलो असे आहे. तुम्ही व्यवस्था काय केली? त्यादिवशी शांततेने मिटींग झाली. त्याच्यात गुरे-ढोरे हे त्याचे निर्देश काही तुमचे गेले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी स्थायी समितीला आणि सर्व विभागाला असे आश्वासित करतो की, मागच्या स्थायी समितीमध्ये आपण मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे शहर पातळीवर दोन दिवसापूर्वी या विभागाचे अपर पोलिस अधिक्षक, प्रांत अधिकारी, तहसीलदार आम्ही स्वतः या सर्वांच्या उपस्थित शहरातील प्रतिष्ठीत नागरिक, सेवा संस्थेचे पदाधिकारी शांतता समितीचे पदाधिकारी आणि गणेश मंडळाचे पदाधिकरी यांची एक सामुहिक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केल्या यापूर्वी स्थायी समितीमध्ये काही सुचना होऊन निर्णय झालेले आहेत. त्यांच्या बंमलबाजवणीच्या अनुषंगाने सर्व कार्यालयीन अधिकाऱ्यांना आम्ही निर्देश दिलेले आहेत. या अनुरुप अजुन कामकाजामध्ये सुसुत्रता येण्यासाठी या बैठकीच्या नंतर माझ्या चेंबरमध्ये सर्व विभाग प्रमुखांची बैठक बोलावलेली आहे. मी आपणाला एवढे आश्वासीत करु इच्छितो की, आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत. आपल्या सर्व आवश्यकता सुचनांची कार्यान्वीत होतील अशी आम्ही दक्षता घेवू आणि कोणत्याही गोष्टीची अडचण निर्माण होणार नाही. या अनुशंगाने आम्ही कारवाई करु. गणपतीचा सण सर्वांनी मोठ्या जल्लोषात, आनंदात आणि धार्मिक भावनेने आपण साजरा करणार आहोत. यात महानगरपालिकेकडून कोणतीही कमतरता होणार नाही. माझ्या घरी गणपती आहे सर्वांनी यावे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जसे आता सांगितले .............

**जेन्वी अल्मेडा :-**

अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने बोलते. साहेब, माझ्या शेजारी एक डेंग्युचा पेशन्ट आहे. तर मग साफसफाईसाठी कुठंपर्यंत प्रोसीजर चालू आहे.

**रोहिदास पाटील :-**

म्हणून त्या दिवशी दोन विषय आणले होते. आणि ते विषय विषयपत्रिकेवर नव्हते म्हणून मागे ठेवले. की डेंग्युच्या पेशन्टला तुम्ही वैद्यकीय मदत देणार की नाही? तुम्ही बंद का केली? का देत नाही? साहेब, कोणीतरी ह्याचे उत्तर द्यायला पाहिजे. असे कुठे नव्हते की, डेंग्युच्या पेशन्टला कोणी मदत करु नये. असे कोणत्याही मा. महासभेत झालेले आहे असे मला आठवत नाही. त्यांना आपण मदत देत नाही. का देत नाही? त्यांना विचारा आणि नाकाडी साहेबांना सांगा की, चालू ठेवा म्हणून.

**जयंत पाटील :-**

काका आपल्या शेजारी एक पांजुचे बेट आहे. तिथे चिकनगुनियाची साथ आलेली आहे. आणि ते ही प्रचंड प्रमाणात आणि संपूर्ण गावात प्रत्येक घरातली माणस आजारी आहेत. ती माझी कालची माहिती आहे. ती साथ आपल्या पर्यंत यायला वेळ लागणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपल्यापर्यंत येईल. त्याच्यावर आपण दक्षता घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

प्रत्येक घरामध्ये माणस आजारी आहेत.

**रोहिदास पाटील :-**

नाकाडी साहेब, अडचण काय आहे ते बोला ना. आम्हाला कोणी विचारलं तर उत्तर देता आले पाहिजे की नाही. देत नाही म्हणजे कोणी बंद केले. नाकाडी साहेबांच्या मनात आले म्हणून बंद केले. खतगावकर साहेब, त्यांनी बंद केले की मा. आयुक्त साहेबांनी बंद केले? बंद कोणी केले? ते तरी सांगा.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, आपण पालिकेमार्फत आर्थिक मदत करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

साहेब, ऐकून घ्या. मी तुम्हाला आताची परिस्थिती सांगतो. आपल्याकडे मागे रेल्वे बॉम्बस्फोट झाला आपण लोकांनी काही मदत केली का? मी काल मुख्यमंत्र्यांना डायरेक्ट बोललो. मला बोलायला देत नव्हते. पण मी बोललो की, मला बोलायचे आहे. ते मला बोलायला देत नव्हते.

**जयंत पाटील :-**

महापालिकेचा अपमान आहे.

**मा. सभापती :-**

मी त्यांच्याशी बोललो आणि सांगितले की, मिरा भाईंदरमध्ये रेल्वे बॉम्बस्फोट झाला. त्या ठिकाणी प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये लोकांना ठेवले. आमच्या जबाबदारीवर आज त्यांना शासनाकडून पैसे मिळाले नाही. तर डॉक्टरांना पैसे कोण देणार? जबाबदारी कोण घेणार?

**रोहिदास पाटील :-**

आपण मुलाखती दिल्या.

**जयंत पाटील :-**

महापालिकेने पैसे दिले.

**रोहिदास पाटील :-**

महापालिका खर्च देईल. मा. आयुक्त साहेबांनी पण खर्च केले. मा. महापौर मॅडम यांनी पण खर्च केले.

**जयंत पाटील :-**

मा. महासभेत विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

एक रुपया दिलेला नाही. महापालिकेने बॉम्बस्फोटातल्या जखमींना एक रुपयाचेसुध्दा औषध दिलेले नाही. आणि नाकोडा हॉस्पीटलमध्ये जैन डॉक्टर एका पेशन्टसाठी औषध देतात. आजपर्यंत त्यांना एक रुपया मिळालेला नाही. त्याला परवा राम नाईक साहेब घेवून गेले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सभापती महोदय, कालच्या मा. महासभेला नव्हते. त्यांना कदाचित कल्पना नाही. आपल्या मागच्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर हा विषय होता आणि सन्मा. सर्व पदाधिकारी, मा. महापौर, या भागातले सर्व विविध पक्षाचे नेते आणि मा. आयुक्त यांनी निर्णय घेतलेला होता की, असे काही दुर्देवी अपघातामध्ये सापडलेले आहेत त्याचे रितसर याठिकाणी उपचार व्हायला पाहिजे. आणि त्यांचा खर्च महापालिका देईल आणि त्याप्रमाणे आपण सर्वांना लेखीसुध्दा दिले होते आणि त्या अनुषंगाने २० लाख रुपयांचे बिल आपल्याकडे आलेले आहे. मंजुरीचा विषय आपण महापालिकेला ठेवला होता. पण दरम्यानच्या कालामध्ये रेल्वे हे पैसे देत आहे. १० लाख रुपयांचा निधी आपल्या शहरात वाटलेला आहे. या सोमवार पर्यंत उर्वरित निधी वाटणार आहे. ज्या अधीन अजुन असे कोणी वंचित असतील तर त्यावर मा. महासभेने अंतिम निर्णय राखुन ठेवलेला आहे. ते पैसे महापालिका देणार आहे. ती शाहनिशा करुन तो अहवाल आम्ही सादर करणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही लोकांच्या भावनेशी खेळ खेळता असे होईल. आपण मदत कधी करतो. ज्या दिवशी जखमी झाले, ज्या दिवशी अपघात झाला त्या दिवशी तुम्ही रुपये दिलेले नाहीत. तुम्ही हात बांधुन ठेवले. सगळ्यांनी तोंडघशी पाडले. नंतर रेल्वेचे सर्क्युलर आले. तुमच्याकडे रेल्वे सर्क्युलरची तारिख कधीची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याकडे आहे ना. मी तुम्हाला सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

त्याला किती दिवस झाले? जर आधी डॉक्टरांना पैसे दिले असते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ड्युब्लीकेशन व्हायला नाही पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अजुनही खरी माहिती द्यायला तयार होत नाही. तुम्ही एका डॉक्टरला चेक दिलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

एका डॉक्टरला नाही. तीन डॉक्टरांना चेक दिलेला आहे. आपल्याकडे लिहलेले आहेत. त्याची कारवाई आणखीन चालूच होती. दरम्यानच्या काळामध्ये ज्यावेळेस रेल्वे मंडळाकडून माहिती मिळाली त्यावेळेला त्याचे ड्युब्लीकेशन व्हायला नाही पाहिजे आणि शहरातील डॉक्टरांनी या कामामध्ये जी मदत

केलेली आहे. त्याचे कुणाचेही बिल वंचित राहणार नाही. असे असेल तर आपल्या निर्दशनास आणावे आपण ते बिल सर्व अदा करु. त्याची कोणतीही बाब येणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही बिल कसे अदा कराल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रेल्वेनी नाही दिले तर आपण द्यायचे.

**रोहिदास पाटील :-**

पण त्याच वेळेला तुम्हाला मोठेपणा दाखवण्याची संधी होती की, आम्ही डॉक्टरांचे बिल दिलेले आहे. रेल्वेनेही पैसे द्यावे.

**ग्रिटा फॅरो :-**

आपण नागरिकांना मदत करतो.

**रोहिदास पाटील :-**

ह्यांचे कसे होते की, नाकोडा हॉस्पीटलमध्ये पेशन्ट आहे. हार्टचे पेशन्ट आहे. हे डॉक्टर बसलेत बॉम्बस्फोट झाला ना. पोलिस पंचनामा झाला ना. डॉ. चे बिल ह्यांच्याकडे आले असते. ह्या लोकांनी आठ दिवस नाही, महिना घालवलेला आहे. आपल्या महापालिकेचे  जे क्रडिट मिळाले असते आणि रेल्वेकडून पैसे ही परत मिळाले असते. माझा सांगायचा उद्देश असा आहे की, तुम्ही एक संधी घालवता आपला गोळमेळ बोलतात. आपल्या इथे खरं कोणीही बोलत नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

डेंग्यु पेशन्टच्या संदर्भात आपण रुलिंग द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

डेंग्युच्या बाबतीत मा. आयुक्त साहेबांशी चर्चा करुन आपण त्याच्यावर कारवाई करुन घेवू. मला त्याच्या बद्दलची कल्पना नाही.

**रोहिदास पाटील :-**

इथे जर असे असेल तर त्रासच होईल. मिरारोडला पण अडचण होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही जितके धोरणात्मक फायनल करतो.

**मा. सभापती :-**

मगाशी खतगावकर साहेबांकडे आमचा विषय झाला. परंतु, आपल्याकडे गोषवारा नव्हता. तो गोषवारा कशापध्दतीने द्यायचा. या विषयावर आमच्या दोघांची चर्चा झाली. मी सांगितले की, शहरामध्ये कुठलीही अतिवृष्टी झाली, कुठला प्रसंग ओढून आला तेव्हा नगरसेवक कुठेतरी असतील, जर त्यांना आपण फोन दिले. तर त्यावेळेस आपल्याला उपयोग पडू शकतील. म्हणून त्यांना फोन द्यायचा.

**एस. ए. खान :-**

खतगावकर साहेब, डॉ. चव्हाणचे बिल दिले का? तुम्ही त्यांचा चेक बनवून घ्या ना.

**रोहिदास पाटील :-**

ती कंपनी तयार आहे. तुम्ही आता फोन करा.  ते तुम्हाला नाही सांगणार नाही.  ते तेवढे इन्स्ट्रयुमेन्ट घेवून येतील. आम्हाला घाई आहे. तुम्ही आम्हाला पहिल्यांदा फोन द्या.

**प्रकरण क्र. ८९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पाणीपुरवठा विभाग)

**ठराव क्र. ९१ :-**

imara Baa[-Mdr mahanagarpailakocyaa paNaI purvaza ivaBaagaakrIta maa.Aayau@t सो. यांनी maMjaUrI idlaolyaa p`stavaaMcaa tpSaIla KalaIla p`maaNao Aaho.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | मजूर संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | उत्तन पाली येथे मच्छीमारांकरीता सिंटेक्सची टाकी बसविणे. | रु. ४,९३,२५९/- | नवलाई मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. ठाणे जि. ठाणे |
| २ | १०० मि.मी. ते ३०० मि.मी. व्यासाच्या गळती दुरुस्तीसाठी सि.आय.क्लॅम्पचा पुरवठा करणे. | रु. ४,८७,६३०/- | उत्कर्षा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. ठाणे जि. ठाणे |
| ३ | १०० मि.मी. ते ६०० मि.मी. व्यासाच्या गळती दुरुस्तीसाठी सि.आय.क्लॅम्पचा पुरवठा करणे. | रु. ४,९५,१७६/- | उत्कर्षा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. ठाणे जि. ठाणे |

वरील कामी मा. जिल्हा निबंधंक ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर सह. संस्थाना स्विकारणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ खंड ड नुसार वरील प्रकरणी मा. स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर करणेत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, प्रशासन अधिकारी आपणा सर्वांना गणेश उत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा. हा गणेश उत्सव आपल्या शहरामध्ये चांगल्या तऱ्हने जावा. हे मी आपणांकडून अपेक्षा करतो आणि कुठल्या करिता गालबोट शहरामध्ये लागता कामा नये ही नम्र विनंती करुन आजची मिटींग संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.२० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**